जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
Address – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in Ph.020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.०९/०६/२०२४
## दि.०८/०६/२०२४ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे ६६२/२०२४,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | एक मुलगा वय १७ वर्षे,रा.कोंढवा खु.पुणे |
| **आरोपीत** | मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०८/०६/२०२४ रोजी रात्रौ.००/१५ वा.च्या सुमारास ताहेरी क्लिनीक समोर, साळुंखे विहार रोड,कोंढवा खुर्द,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे मोबाईल पाहत पायी जात असताना,नमुद इसमांनी दुचाकीवरून त्यांचे जवळ येवुन,फिर्यादी यांचे हातातील १५,०००/-रुकिं.चा मोबाईल जबरी चोरी करून नेला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी.अमित शेटे,मो.नं.८८८८८८३५८२ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे ९३०/२०२४,भादविक ४५४,४५७,३८० |
| **फिर्यादी** | सुरेश शेगर वय ४५ वर्षे,रा.हडपसर पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ११/०५/२०२४ रोजी सकाळी १०/०० ते दिनांक ०७/०६/२०२४ रोजी सकाळी ०९/०० वा.चे दरम्यान फिर्यादी यांचे राहते घर स.नं.३८/१,ओमकार कॉलनी,काळेपडळ हडपसर पुणे. |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा राहता फ्लॅट कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने घराचे पाठिमागील दरवाजा तोडून घरा मधून रोख ४,९०,०००/-रुपये, सोन्याचे दागिने व इतर वस्तू असा एकुण ६,८२,६००/-रु कि.चा ऐवज घरफोडी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी.अर्जुन कुदळे,मो.नं.९४२०२२४४३० |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड पो स्टे ३३७/२०२४,भादविक ३०४(अ) |
| **फिर्यादी** | विशाल वसंत गवळी पोलीस अमंलदार सिंहगड रोड पोलीस ठाणे पुणे शहर |
| **आरोपीत** | कॉन्ट्रॅक्टर, (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०७/०८/२०२४ रोजी सकाळी १०/३० वाजणेचे सुमारास सर्व्हे नं.१०५ पोट हिस्सा नं.५ येथिल लक्ष्मी सदन कन्ट्रक्शन साईट पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसम ठेकेदाराने त्याचे पुणे येथील बांधकाम चालु असलेल्या साईटवरील,मजुर कामगारांकडुन काम करवुन घेत असताना त्याचे जिवीताचे संरक्षणाचे दृष्टीने सेफ्टी बेल्ट,हेल्मेट,तसेच बांधकामाचे टप्यानुसार संरक्षक जाळी लावणे आवश्यक असताना नमुद सुविधा न पुरविता साईटचे चौथ्या मजल्यावर औदुंबर हाईट्स इमारतीचे बाजुचे भिंतीलगत बांबुच्या सहाय्याने बाहेरील बाजूस तयार केलेल्या पाडावर प्लास्टर काम करत असताना नमुद पहाडाचा बांबू तूटुन खाली जमिनीवर पडल्याने यातील गवंडी काम करणारी महिला वय १७ वर्षे रा.सुदंर आंगण सोसायटी पोकळेवस्ती धायरी पुणे हिचे डोक्यास जबर मार लागुन मयत झाली आहे. तसेच यातील नमुद इसम ठेकेदार याचे डोक्यास तसेच खुब्यास मार लागुन जखमी होवुन अपघातास कारणीभुत झाला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.श्रीकांत सावंत मो.नं.९५५२५५६४२४ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सहकारनगर पो स्टे १९७/२०२४,भादविक ४१९,४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक इसम वय ४९ रा.धनकवडी पुणे |
| **आरोपीत** | मोबाईल धारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०५/०१/२०२४ रोजी ते दिनांक १५/०२/२०२४ रोजी रहाते घरी ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा विश्वास संपादन करुन अनोळखी व्यक्तीने ऑनलाईन वेगवेगळे टास्क पुर्ण करण्यास सांगुन टास्क ट्रेडिंगमध्ये नफा मिळवता येवु शकतो असे आमिष दाखवुन ऑनलाईन लिंक पाठवुन त्याव्दारे फिर्यादी यांना बँकेच्या विविध अकाऊंटवर पैसे जमा करण्यास लावुन तसेच भरघोस नफा मिळकत असल्याचे भासवुन फिर्यादी यांना कोणताही परतावा न देता फिर्यादी यांची १५,४०,०००/- रुपयेची अर्थिक फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | वरिष्ठ पो.निरी.सुरेंन्द्र माळाळे मो.नं.९३०७०४३८४५ |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विमानतळ पो स्टे २६९/२०२४,भादविक ३०४(अ),२७९,मोव्हेॲक्ट कलम १३२,१३४,११९/१७७ |
| **फिर्यादी** | दशरथ जाधव वय २६ वर्षे रा.लोहगाव,पुणे |
| **आरोपीत** | अनिल मारुती राठोड वय २९ वर्षे रा.सदगुरु प्लाटजवळ,खांदवेनगर,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०७/०६/२०२४ रोजी रात्रौ २०/४५ वा.चे सुमारास झेडपी शाळेजवळ खांदवेनगर,लोहगाव, पुणे येथील सार्वजनिक रोडवर |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील टॅकर हा वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने ,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी फिर्यादी याचा भाचा वय १० वर्षे हा सायकल खेळत असताना त्यास पाठीमागुन धडक देवुन,त्यास गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत होवुन,अपघाताचे ठिकाणी न थांबता,अपघाताची खबर न देता पळुन गेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.चेतन भोसले मो.नं.९९२१०६६५६४ |

६

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोथरुड पो स्टे १६५/२०२४,भादविक ४१९,४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक महिला वय ३६ वर्षे,रा.रामबाग कॉलनी,पौड रोड,पुणे |
| **आरोपीत** | मोबाईल धारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०९/०५/२०२४ रोजी ते दि २७/०५/२०२४ पर्यंत ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांना अनोळखी इसमाने टास्कद्वारे कामकाजाचे प्रलोभन दाखवून सुरूवातीस काही प्रमाणात नफा देवून,फिर्यादी यांचा विश्वास संपादन करून,त्यांची मूळ रक्कम तसेच नफा असे एकूण ४०,६८,५९५/- इतक्या रकमेची फसवणूक केली, |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे) विक्रमसिंह कदम मो.नं.८०९७०४७८८८ |

७

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विमानतळ पो स्टे २७०/२०२४,भादविक २७९,३०४(अ),३३७,३३८,४२७, मोटार वाहन अधिनियम १९८८ चे कलम १८३,१८४,११९/१७७, |
| **फिर्यादी** | आचंल यादव वय २२ वर्षे रा.लोहगाव पुणे,मुळगाव उत्तरप्रदेश |
| **आरोपीत** | कार चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१६/०५/२०२४ रोजी रात्रो ०१/५० वा.चे सुमारास संजय पार्क कॉर्नर,लोहगाव पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील स्नेहित सोनकांबळे याचे मालकीची कार हिचेमधुन फिर्यादी यांचे पती सह लोहगाव वरुन येरवडा पुणे येथे घेऊन जात असताना वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी एक मोटार सायकल समोरुन आल्याने गाडीचा ब्रेक दाबुन सदरची कार रोडचे कडेला असलेले झाडाला धडकवुन गाडीचे नुकसान करुन स्वतःला तसेच स्नेहित सोनकांबळे यांना किरकोळ जखमी होणेस व फिर्यादी यांचे पती अरविंद शंकर यादव वय २८ वर्षे रा.खरात कॅपिटल बिल्डींग, वडगाव शिंदे रोड लोहगाव पुणे,यांचे डोक्याला गंभीर दुखापत करुन त्यांचे मृत्युस कारणीभुत झाला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी.एस.के.पोटे मो.नं.७७४४८११११०० |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**